सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी मोहोरबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) कामाचे नांव | : | सन २०११-१२ या वर्षासाठी जि.प.सिंधुदुर्गचा छपाई / बांधणी मक्त्याचा दरकरार निश्चित करणे. |
| २) अंदाजित रक्कम | : | रु. २७,००,०००/-(अक्षरी रुपये सत्तावीस लाख मात्र) |
| ३) मक्त्याची मुदत | : | मंजूरी नंतर पुढे एक वर्षासाठी. |
| ४) निविदा अटी, नियम,फॉर्ममिळण्याचे ठिकाण , दिनांक व वेळ | : | भांडार शाखा वित्त विभाग जि.प.सिंधुदुर्ग<br>दिनांक ८ / ११ /२०११ ते २२ / ११ /२०११<br>सकाळी ११ ते दुपारी १३.३० पर्यंत |
| ५) निविदा फॉर्मची किंमत | : | रु. १०००/- (अक्षरी रु. एक हजार मात्र.) |
| ६) निविदा स्विकारण्याचे ठिकाण दिनांक व वेळ | : | निविदा कक्ष, जि.प.सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी.<br>दिनांक १९ / ११ /२०११ ते २३/११/२०११<br>सकाळी ११ ते दुपारी १३.३० पर्यंत |
| ७) निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | : | दिनांक २३ / ११ /२०११ रोजी ठिक १६.०० वाजता. |
| ८) निविदेसोबत देणेची बयाणा रक्कम | : | रक्कम रुपये २७,०००/-(अक्षरी रुपये सत्तावीस हजार मात्र) |
| ९) निविदा स्विकारल्यानंतर मंजूर मक्तेदारास द्यावे लागणारे तारण व त्याचे स्वरुप | : | रक्कम रु. ५४,०००/- ( अक्षरी रु. चौप्पन्न हजार मात्र.) |
| १०) निविदा स्विकारणेचा अंतीम निर्णय कोणाचा. | : | वित्त समिती , जिल्हा परिषद सिंधुदुर्ग. |

निविदेच्या अटी व शर्ती कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

तसेच निविदा सूचना, निविदेच्या अटी व शर्ती www.zpsindhudurg.com या जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

स्वाक्षरी /-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

जा.क्र.सिंजिप/वित्त/फ-१०(१)/ /११,
वित्त विभाग, जिल्हा परिषद सिधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी , दि. /११/२०११.

प्रतः- १) संपादक , दैनिक तरुण भारत, बेळगांव
२) संपादक , साप्ताहीक देवदूर्ग,देवगड जि.सिंधुदूर्ग

कृपया सदरची नोटीस आपल्या वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करून त्याचे देयक दोन प्रतीत आगावू पावतीसह त्वरीत पाठविणेत यावे.

प्रतः- १) खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग.
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व )
३) मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग
४) संगणक शाखा कार्यवाहीसाठी

कृपया सदरची नोटीस आपल्या बोर्डावर प्रसिध्द करावी.

सही/xxx
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या सन २०११-१२ या कालावधीतील छपाई व बांधणी या कामाचे निविदेसाठी नियम व अटी

१)मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नांवे बयाणा रक्कम रु. २७,०००/-(रु. सत्तावीस हजार मात्र ) चे चलन वित्त विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग या कार्यालयाकडून पास करुन घेऊन सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्गनगरी येथे भरावयाचे आहेत.

२)निविदा लखोटा क्रमांक १ मध्ये (१) फॉर्वडींग लेटर,(२) बयाणा रक्कमेचे चलन किंवा बयाणा रक्कम भरण्यात सूट असल्यास तसा सक्षम अधिका-याचा दाखला (३) आयकर दाखला, नादेय दाखला (४) विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र, नादेय दाखला (५) प्रोफेशन टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र,नादेय दाखला (६) पूर्वानूभव दाखला. वरील सर्व अदयावत कागदपत्रांच्या छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असणे आवश्यक आहे. पूर्ण निविदा पेजिंग करुन पानावर सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

३)निविदा लखोटा क्र. २ मध्ये फक्त दर नमूद केलेले परिपूर्ण निविदा फॉर्म ठेवावेत.(स्वाक्षरीसह शिक्का मारुन) दोन्ही लखोटयांच्या खालील डाव्या बाजूस मक्तेदाराचे नांव तसेच प्रेसचे नांव व पूर्ण पत्ता लिहिणेत यावा. तसेच लखोटयावर लखोटा क्रमांक व वरील बाजूस ज्या कामाची निविदा आहे त्या कामाचे नांव नमूद करावे.

४)लखोटा क्रमांक १ व २ दोन्ही मोहोरबंद असणे आवश्यक आहे. लखोटा क्रमांक १ मध्ये बयाणा रक्कमेचे चलन व इतर बाबी पूर्ण आढळून न आल्यास लखोटा क्रमांक २ उघडला जाणार नाही.

५)निविदेत दिलेले दर अंकी व अक्षरी सुस्पष्ट असणे आवश्यक आहे. संपूर्ण फॉर्म भरणे आवश्यक आहे. खाडाखोड ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी निविदा धारकाने स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. अन्यथा निविदा ग्राहय धरली जाणार नाही. तसेच कोणतेही अटीयुक्त दर ग्राहय धरले जाणार नाहीत. फॉर्मसाठी दर (प्रति हजारी) व रजिस्टर्स व पावती पुस्तक यासाठी दर (प्रतिनग) देण्याचे आहेत. तसेच वाहतुक भाडे व इतर सर्व करासहीत दर देण्याचे आहेत. दर मंजूर केल्यानंतर कोणताही पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही.

६)निविदेतील दरपत्रक कार्यालयाने पुरविलेल्या नमुन्यातच देणे बंधनकारक आहे.निविदा फॉर्ममधील प्रत्येक पानावर मक्तेदार यांची सही असणे बंधनकारक आहे.

७)ज्याची निविदा मंजूर होईल त्याला रु. १००/- चे स्टॅप पेपरवर करारपत्र करुन देण्यापूर्वी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे नांवे सुरक्षा अनामत रक्कम रु. ५४,०००/- (रु. चौपन्न हजार मात्र) या कार्यालयाकडून चलन पास करुन सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्गनगरी येथे भरावे लागतील. पुरविण्यात आलेले साहित्य त्याच तपशिलाप्रमाणे असल्याची खात्री पटल्यावर व हमी कालावधी संपल्यावर सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.

८)ज्याची निविदा मंजुर होईल त्याला मंजुरी आदेश दिल्यापासुन ८ दिवसांचे आत रक्कम रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन दयावे लागेल. तसे न केल्यास सुरक्षा अनामत जप्त केली जाईल.

९)निविदा स्विकारण्याच्या तारखेस कोणत्याही कारणास्तव कार्यालय बंद असल्यास लगतच्या पुढील कार्यालयीन कामाच्या दिवशी नोटीसीमध्ये नमूद केलेल्या वेळेला निविदा स्विकारणात येईल.

१०) निविदा विहित केलेल्या दिनांकास व वेळेच्या आत निविदा कक्षात आणून देणे आवश्यक राहील. उशिरा प्राप्त झालेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

११) कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. निविदा सादर करणा-या कोणत्याही व्यक्तिला अगर संस्थेला याबाबत स्पष्टिकरण मागता येणार नाही.

१२) छपाई बांधणी कामासंबधी कार्यालय प्रमुख यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे नमुन्यानुसार छपाई करुन साहित्य दिलेल्या ठिकाणी पोहोच करावयाचे आहे.

१३) सर्व प्रकारचे रजिस्टर्स, वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक, मासिक /वार्षिक लेखे इत्यादीचे दर छपाई/बांधणी खर्चासह देण्याचे आहे. बांधणी खर्च स्वतंत्र दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. छपाई मजकूर व छपाईबाबतचे नमुने जिल्हा परिषदेच्या वित्त विभाग या कार्यालयात कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

१४) जिल्हा परिषदेने दिलेल्या मुदतीत छपाई व बांधणी काम करुन न दिल्यास छपाईबांधणीवर होणा-या खर्चाचे १% एवढी रक्कम दंड म्हणून परस्पर बिलातून कापून घेण्यात येईल व सदर छपाई अन्यत्र करुन घ्यावी लागल्यास त्या पोटी झालेला खर्च मक्तेदारांकडून वसुल करण्यात येईल.

१५) निविदेमध्ये नमूद केलेल्या फॉर्मसाठी उच्च प्रतिचा पांढरा कागद व रजिस्टर्ससाठी खालील नमूद केलेल्या गेजचा कागद वापरण्याचा आहे व त्यानुसार रजिस्टर्स व फॉर्मचा दर निविदेत देणेत यावा.सदर कागदाचा नमुना जि.प.च्या वित्त विभागात पहावयास मिळेल.

१) १८ x २३ इंच = १०.० के.जी.
२) १६ x २६ इंच = ६.३० के.जी.
३) १७ x २७ इंच = ०८.० के.जी. लेजर पेपर
४) २० x ३० इंच = १०.२ के.जी. लेजर पेपर

१६) निविदा फॉर्म मध्ये स्तंभ क्रमांक ३ मध्ये नमूद केल्ल्या छपाईचे संख्येमध्ये आणि साहित्याच्या परिमाणामध्ये कमी-जास्त करण्याचा अथवा कोणतीही बाब रद्द करण्याचा (छपाई/बांधणी दरात न घेणे) अधिकार जि.प.ने राखून ठेवला आहे.

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

मक्तेदाराची स्वाक्षरी

सही/xxx
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

सही/xxx
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com